आर्थिक साक्षरता कार्यक्रम अहवाल

कला शाखा (सत्र : २०२५-२०२६)

महाविद्यालयातील अर्थशास्त्र, कला व वाणिज्य शाखेच्या संयुक्त विद्यमाने दि. 27.9.2025 ला कॉन्फरन्स हॉलमध्ये' 'सेबी अंतर्गत आर्थिक साक्षरता ('SEBI- Financial Literacy Program) या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून नागपूर येथील प्रसिद्ध सेबीचे अधिकृत रिसोर्स पर्सन (Securities Market Trainer) प्रा. सागर तवर यांना आमंत्रित करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. राधेश्याम दिपटे यांनी भूषविले. व्यासपीठावर कलाशाखेचे प्रभारी डॉ. जयंतकुमार मस्के व महाविद्यालयातीलअंतर्गत गुणवत्ता हमी सेलचे संचालक डॉ. विजय व-हाटे प्रामुख्याने उपस्थित होते.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून नागपूर येथील प्रसिद्ध सेबीचे अधिकृत रिसोर्स पर्सन प्रा. सागर तवर यांनी विद्यार्थ्यांना शेअर बाजाराची ओळख करून देताना प्राथमिक व दुय्यम बाजारातील व्यवहार, शेअर खरेदी-विक्रीची पद्धत, मॅच्युअल फंड, डिमॅट खाते व ऑनलाइन ट्रेडिंगची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी प्रा. सागर तवर म्हणाले की , सध्याच्या स्थितीत भारतीय शेअर बाजारामध्ये सतत घसरण होत आहे. अशा स्थितीत तरुणांनी गुंतवणूक करताना योग्य पर्यायाची निवड करणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुणांमध्ये आर्थिक साक्षरता वाढणे आवश्यक आहे. त्यांनी पावर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे प्रत्यक्ष उदाहरणे व आकडेवारीच्या आधारे भारतीय शेअर बाजाराची स्थिती व कार्यपद्धती विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राधेश्याम दिपटे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अशा व्याख्यानांतून मिळालेल्या ज्ञानाचा अभ्यास व करिअरमध्ये उपयोग करून घ्यावा. मनुष्याला त्याच्या दैनंदिन जीवनात योग्य निर्णय घेताना अर्थशास्त्र विषयाचा उपयोग होतो. तसेच डॉ. जयंत मस्के यांनी सांगितले की, जगातील प्रमुख शेअर बाजारामध्ये यंदा भारताच्या सेंसेक्स व निफ्टीने सर्वात कमी परतावा दिला आहे अशा स्थितीत शेअर बाजार हा जुगार असला तरीही पैसा कमवायचा एक उत्तम मार्ग आहे त्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथमतः आर्थिक साक्षरता वाढवून योग्य मार्गदर्शन घेतल्यास भविष्यकाळात गुंतवणुकीतून मोठा फायदा मिळू शकतो .

कार्यक्रमाची प्रास्ताविक महाविद्यालयातील कला शाखेचे प्रभारी डॉ. जयंतकुमार मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अरुण चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. व्यंकटेश मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रेणुकादास उबाळे,

डॉ. राजेश दिपटे, डॉ. मधुकर जाधव, डॉ. आरती साळवे, डॉ. अरुणा बावनकर, डॉ. प्रवीण धकीते, डॉ, सचिन वेरुळकर, डॉ. गोल्डी बगमार डॉ. राजेंद्र बेलोकर, प्रा.नरेंद्र मंडिया, प्रा. विजय चौधरी प्रा. दिक्षात मस्के इत्यादी प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला जवळजवळ 120 विद्यार्थ्यांनी व 20 प्राध्यापकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.













दिनांक- 27. 09. 2025

डॉ. जयंतकुमार एम. मस्के